महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १५२ वा | दिनांक : १३/०३/२०२५ | वार : गुरूवार

## शिवरायांनी हिंदू मुस्लीम भेद केला नाही - उदयनराजे



**मुंबई :** राज्याचे मत्सोद्योग व बंदरे विकास मंत्री नीतेश राणे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यात एकही मुस्लीम व्यक्ती नव्हता असा वादग्रस्त दावा केला होता. त्यांचा हा दावा शिवरायांचे १३ वे वंशज तथा भाजप खासदार उदयनराजे भोसले यांनी जोरकसपणे फेटाळून लावला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी केव्हाच हिंदू - मुस्लीम असा भेदभाव केला नाही. त्यांची सर्वधर्म समभाव अशी संकल्पना होती, असे ते म्हणालेत.

नीतेश राणे गत काही वर्षांपासून हिंदुत्त्वाच्या मुद्यावरून प्रचंड आक्रमक झालेत. त्यांनी नुकतेच शिवरायांच्या सैन्यात एकही मुस्लीम व्यक्ती नव्हता असा दावा केला होता. त्यानंतर हिंदू समाजाच्या लोकांनी मल्हार सर्टिफिकेशनच्या माध्यमातून उघडलेल्या दुकानांतूनच मांस खरेदी करावे असेही ते म्हणाले होते. त्यांच्या या भूमिकेमुळे मोठा राजकीय वाद झाला. या पार्श्वभूमीवर भाजप खासदार उदयनराजे भोसले यांनी त्यांना उघडे पाडले आहे. मी नीतेश राणे यांचे विधान ऐकले नाही. पण छत्रपती शिवाजी महाराजांनी केव्हाच हिंदू - मुस्लीम असा भेदभाव केला नाही. त्यांची सर्वधर्म समभाव ही संकल्पना होती. त्यांनी भेदभाव केला असता तर आपण मोगलांच्या गुलामगिरीत असतो, असे ते म्हणालेत.

नीतेश राणे यांना औरंगजेबाच्या कबरीचे उदात्तीकरण चालले आहे ते खोदून काढा असे म्हणायचे असेल. मी स्वतः कितीतरी वेळा सांगितले आहे की, औरंगजेब आक्रमण करायला आला होता. शिवाजी महाराज व आपले पूर्वज नसते तर आपण अजूनही गुलामगिरीत असतो हे विसरू नका. याचा असा तसा अर्थ काढू नका, असेही ते यावेळी म्हणाले. उदयनराजे कराड येथे यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

उदयनराजे यांनी यावेळी मल्हार सर्टिफिकेशन डॉट कॉमच्या माध्यमातून केवळ हिंदू समाजातील खाटकांना मांस विक्रीचे सर्टिफिकेट देण्याच्या निर्णयाचाही समाचार घेतला. मी नॉनव्हेज खात नाही, पण ज्यांना खायचे आहे त्यांनी ते खावे, असे ते यासंबंधी नीतेश राणे यांना टोला हाणताना म्हणाले.

नीतेश राणे म्हणाले होते, औरंग्याला थांबवण्याचे आणि त्याला आव्हान देण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी केले आहे. आमच्यातले काही कारटे आहेत. ते सांगतात शिवाजी महाराजांच्या सैन्यात मुसलमान होते. कोण मुसलमान नव्हते. उगाच टेपरेकॉर्डर चालवतात. स्वराज्याची लढाई ही इस्लामच्या विरोधातच होती. हिंदू विरुद्ध मुसलमान होती. त्या लढाईत आमच्या राजाने हिंदू धर्माला इस्लामच्या समोर झुकू दिले नाही. हाच आमच्या सगळ्यांचा ज्वलंत इतिहास आहे.

## राबडी म्हणाल्या- नितीश भांग खाऊन विधानसभेत येतात





**पटना :** बिहार विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या 9 व्या दिवशी बुधवारी सभागृहात बराच गोंधळ झाला. माजी मुख्यमंत्री राबडी देवी विधानसभेबाहेर म्हणाल्या - 'मुख्यमंत्री नितीश कुमार हे भांगेचे व्यसनी आहेत, ते भांग सेवन करून विधानसभेत येतात आणि महिलांचा अपमान करतात.'

यापूर्वी विधान परिषदेत राबडी देवी आणि मुख्यमंत्री नितीश यांच्यात वाद झाला होता. राबडी म्हणाल्या- 'बिहारमध्ये कोणतेही काम होत नाहीये.'

या विधानावर मुख्यमंत्री संतापले. ते म्हणाले, 'राजदच्या राजवटीत कोणतेही काम झाले नाही.' राबडी देवींकडे बोट दाखवत ते म्हणाला- 'जेव्हा हिचा पती पायउतार झाला तेव्हा तिला मुख्यमंत्री बनवण्यात आले.'

नितीश म्हणाले, 'महिलांसाठी आधी काही काम केले होते? आपण किती काम केले आहे? आधी कोणी महिलांना शिकवले होते का? आता महिला पुढे आहेत.

'महिला पाचवीपर्यंत शिकत होत्या.' आजच्या महिला किती पुढे आहेत? जर तुम्ही या लोकांच्या जाळ्यात अडकला असाल तर तुम्हाला काहीही माहिती नाही. आधी संपूर्ण गोष्ट जाणून घ्या.

यावर राबडी देवी म्हणाल्या- मुख्यमंत्री नितीश यांनी फक्त महिलांचा अपमान केला आहे. काही लोक नितीश कुमार यांच्या कानात कुजबुजत राहतात, त्यानंतर नितीश कुमार महिलांचा अपमान करतात.

नितीश कुमार म्हणाले- 'हे लोक त्रास निर्माण करत होते. म्हणूनच आम्ही त्यांना सोडून दिले. तुम्ही लोक हे प्रसिद्ध करा की आतापासून आम्ही इकडे तिकडे जाणार नाही.

सभागृहाबाहेर पडलेल्या विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनीही मुख्यमंत्री नितीश यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले की, बिहारमध्ये कायदा आणि सुव्यवस्था संपली आहे. सरकार कायदा बदलून गुन्हेगारांना तुरुंगातून सोडत आहे. नितीश कुमार यांनी गुन्हेगारांसमोर आत्मसमर्पण केले आहे.

## फडणवीसांनी मंत्र्यांना इतिहासाचे धडे द्यावेत - संजय राऊत

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात मुस्लिम लोक नव्हते, असा दावा भाजप आमदार आणि मंत्री नीतेश राणे यांनी केला. या दाव्यावरून संजय राऊत यांनी नीतेश राणेंवर जोरदार टीका केली. मोदींची पिल्लावळ फाळणीची बीज रोवण्याचे काम करत असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला. तसेच ज्यांना हा देश पुन्हा फाळणीकडे ढकलायचा आहे, त्यांची अशी वक्तव्य आहेत, असेही ते म्हणाले.

औरंग्याला थांबवण्याचे आणि त्याला आव्हान देण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात कोणी मुसलमान नव्हते. स्वराज्याची लढाई ही इस्लामच्या विरोधातच होती. हिंदू विरुद्ध मुसलमान होती. त्या लढाईत आमच्या राजाने हिंदू धर्माला इस्लामच्या समोर झुकू दिले नाही, असा दावा नीतेश राणे यांनी केला होता. यावरून मोठा वाद निर्माण झाला. यावर बोलताना संजय राऊत यांनी उपरोक्त टीका केली.

नीतेश राणेंच्या विधानावर आता काय हसावे की काय, मला कळत नाही की, या राज्याच्या मंत्रिमंडळात काय काय नग भरलेले आहेत. माझी वाचाच गेली, असा टोला संजय राऊत यांनी लगावला. छत्रपती शिवाजी महाराज हे सहिष्णू, संयमी, शूर असे योद्धे, सेनापती आणि राजे होते. कोणताही राजा जगाच्या पाठिंबर एक धर्मीय राजकारण करु शकत नाही. औरंगजेबाच्या दरबारात सुद्धा हिंदू राजे होते. तसेच छत्रपतींच्या सैन्यात आणि त्यांच्या सभोवती अनेक मुस्लिम सरदार, योद्धे होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या तोफखान्याचा प्रमुख कोण होता? किंवा शिवाजी महाराजांचे अंगरक्षक कोण होते? मी नाव घेत नाही, बखरी चाळाव्यात, इतिहास समजून घ्यावा मग त्यावर बोलावे, असे संजय राऊत म्हणालेत.

सध्या ही इतिहास बदलण्याची प्रक्रिया सुरु असून ती अत्यंत गंभीर आणि घातक आहे, असेही राऊत म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या स्वराज्यासाठी पहिली लढाई औरंगजेबाबरोबर नाही, तर चंद्रराव मोरेबरोबर केली हा इतिहास आहे. या चंद्रराव मोऱ्यांचे काही वंशज जर मंत्रिमंडळात असतील तर माननीय देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या सर्व मंत्र्यांना इतिहासाचे धडे हे योग्य इतिहास तज्ज्ञाकडून द्यावेत, असा सल्ला संजय राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना दिला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ मार्च २०२५


## इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्सचा अंजना प्रतिष्ठाण आसेगावच्या स्मिता पल्हाळ यांना शिक्षण श्रेत्रातील राष्ट्रीय सीएसआर पुरस्कार



**पडेगाव (शिवाजी गायकवाड) :** येथून जवळच असलेल्या आसेगाव येथिल अंजना प्रतिष्ठान च्या वतीने अंजना स्कूल ऑफ एक्ससेलेंस नावाने शिक्षण संस्था मागील पंधरा वर्षांपासून चाविण्यात येते शाळेच्या माध्यमातून वेगवेगळ्या क्षेत्रात विध्याथ्यांनी नावलौकिक प्राप्त केला आहे. येथिल शैक्षणिक व्यवस्थापन आणि शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता पाहता इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स चा अंजना प्रतिष्ठाण आसेगावला शिक्षण श्रेत्रातील राष्ट्रीय सीएसआर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. इंडियन कॉमर्स ऑफ चेम्बर चे राष्ट्रीय सदस्य तथा भारतीय शास्त्रज्ञ डॉ रवी मोरो आणि राजेंद्र येंगडे आयसीसीएए सदस्य यांच्या हस्ते हा राष्ट्रीय स्तरिय सीएसआर पुरस्कार शाळा व्यवस्थापन समितीच्या संचालक तथा कब्बडी च्या राष्ट्रीय खेळाडू सौ.स्मीता शंकर पल्हाळ यांना प्रदान करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शासकीय वैध्यकीय महाविद्यालयांच्या माजी अधिष्ठाता स्त्री, बालरोग तज्ञ राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त डॉ. कानन येळीकर, माजी प्राचार्य डॉ. सी एस पाटील,गंगापूर तालुका क्रीडा अधिकारी लता लोंढे, आसेगाव सरपंच सविता दिपक राजगुरू अंजना प्रतिष्ठाण चे संस्थापक अध्यक्ष शंकर पल्हाळ,उपाध्यक्ष मोनिका पल्हाळ, संचालक स्वर्णजित पल्हाळ , स्नेहा पवार, देव साठे, शिवाजी गायकवाड , आदी ची उपस्थित होती.

## मुख्यमंत्र्यांनी साधला अपघातग्रस्त कुटूंबियांशी संवाद सर्वोतोपरी मदतीचे आश्वासन



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यात उसाचा ट्रक उलटून झालेल्या अपघातात सहा उसतोडणी मजुरांचा मृत्यू झाला होता. दि. ०९ मार्च रोजी कन्नड तालुक्यात घडलेल्या या भीषण अपघातात एकाच गावातील पाच मृत्यू पावले होते. त्यामुळे संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. त्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी दि. ११ मार्च रोजी सातकुंड येथे मृतकांच्या कुटुंबीयांच्या घरी जाऊन त्यांना धीर देऊन सांत्वन केले, याप्रसंगी श्री खंबायते यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्या कार्यालयाशी प्रत्यक्ष फोनवर संपर्क साधून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्याशी कुटुंबियांचा संवाद साधून दिला.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पिडित कुटुंबयांना शासकीय स्तरावरील सर्व मदत तात्काळ मंजूर करण्याची आश्वासन मुख्यमंत्री कार्यालयाने दिले. तसेच सविस्तर अहवाल पाठविण्या बाबत उपविभागीय अधिकारी यांना सुचना दिल्या. यावेळी त्यांच्या सोबत तांडासुधार वस्ती समीती सदस्य अनिल चव्हाण, भाजप कन्नड शहराध्यक्ष सुनील पवार, तालुका सरचिटणीस कैलास जाधव, कोषाध्यक्ष सुदाम पवार, उमेश चव्हाण आदी उपस्थिती होती.

## उस तोडणी कामगारांचा मानवी निर्देशांक वाढविण्यात यावा- विष्णू राठोड



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड तालुक्यातील दुर्घटनेत उसतोडणी कामगारांच्या मृत्यू मुळे उसतोडणी कामगारांच्या सुरक्षा व जीवनमाना चा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शासना मार्फत विविध समाज घटक व कामगारां साठी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्याच धर्तीवर ऊन, थंडी वार्यात रात्री अपरात्री आपला जीव धोक्यात घालून ऊसतोडणी चे काम करणाऱ्या उसतोडणी कामगारांसाठी विविध योजना राबवून त्यांचा मानवी निर्देशांक वाढविण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा भारतीय जनता पार्टी भटके विमुक्त मोर्चा चे कन्नड तालुकाध्यक्ष विष्णू राठोड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समीतीत ज्या प्रकारे हमाल, व्यापारी, ग्रामपंचायत व सोसायटी सदस्य मतदारसंघ असतात. त्या धर्तीवर साखर कारखाना संचालक मंडळात उसतोडणी कामगारांना प्रतिनिधित्व देण्यात यावे. उसतोडणी कामगारांच्या पाल्यांना कारखाने व सरकारी नोकरीत आरक्षण द्यावे. उसतोडणी कामगारांच्या पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी कारखाने व सरकार ने घ्यावी.

उसतोडणी कामगारांना उसतोडणी व्यवसायात येणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानात वापर अधिकार व आधुनिक तोडणीयंत्र खरेदी साठी जास्तीत जास्त अनुदान उपलब्ध करुन द्यावे. कामगारांचे जीवनमान उंचविण्या साठी उसतोडणी, वाहने भरणे, आदी काम च्या वेळा ठरविण्यात याव्यात जेणे करुण अतीश्रम, रात्री अपरात्री काम करण्यास भाग पाडू नये. उसतोडणी कामगारांनी मुकादम, कारखानदार यांच्या कडून घेतलेल्या अगाऊ (उचल) पैशांवर कुठल्याही प्रकारची व्याज आकारणी करु नये. उसतोडणी कामगार व त्यांचे पाल्य, परिवार यांचे जीवनमान सुधारण्यासाठी समिती गठित करुण त्यांचा व परिवाराचा मानवी निर्देशांक सुधारण्यासाठी शासनाने उपायोजना कराव्यात अशी मागणी या निवेदनात केली आहे.

## कन्नड येथील शिक्षण परिषद उत्साहात संपन्न झाली



**कन्नड :** कन्नड केंद्रांतर्गत शिक्षण परिषद अतिशय मध्ये संपन्न झाली यावेळी महिलांना कार्यक्रमाचा मान देण्यात आला ।शिक्षण परिषदेमध्ये निपान भारत या विषयावर केंद्रप्रमुख बाजीराव ताठे यांनी मार्गदर्शन केले यावेळी केंद्रीय मुख्याध्यापक शेख अकबर हिवरखेडा गवताळ्याचे मुख्याध्यापक बाबासाहेब गावंडे मकरनपूर मुख्याध्यापक मधुकर पवार सतीश कोळी रेलचे मुख्याध्यापक प्रवीण शिंदे महिला प्रतिनिधी म्हणून उषा महाजन साखर कारखाना मुख्याध्यापक रंजना वाघ त्यानंतर कन्नड केंद्रामध्ये आत्ताच आलेल्या सहशिक्षिका वर्षा दा आवळे आदींची प्रमुख उपस्थिती होती यावेळी शालेय कामकाजाबद्दल बाळासाहेब गावंडे यांनी सोकल असं मार्गदर्शन केलं या परिषदेस कन्नड नंबर तुमच्या मुख्याध्यापिका अर्चना पाटील फरीन पठाण सुवर्णा गायके रेल तांड्याचे मुख्याध्यापक संदीप गुंजाळ आदींची प्रमुख उपस्थिती होती


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ मार्च २०२५


## पिट्टी इंजिनिअरिंग लिमिटेड येथे राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर (शिवाजी गायकवाड) :** पिट्टी इंजिनिअरिंग लिमिटेड येथे राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आणि त्याचा समारोप दिमाखात पार पडला. या सप्ताहादरम्यान विविध सुरक्षा जनजागृती उपक्रम, प्रशिक्षण सत्रे आणि कर्मचाऱ्यांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.कार्यक्रमाची सुरुवात ही औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय चे सह संचालक अधिकारी श्री प्रमोद सुरसे सर यांच्या हस्ते तर समारोप सोहळ्याला श्री सचिन इंगोले (पोलीस निरीक्षक वाहतुक विभाग )वाळूज छत्रपती संभाजीनगर या कार्यक्रमाला कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली. या प्रसंगी कंपनीचे वरीष्ठ अधिकारी..श्री अविनाश पाटील, प्रशांत रिंधे, व्यंकटेश धामणगावकर, विश्राम लेले, रमनाराव, पंकज धावडे, प्रशांत पाटील, प्रशांत केदारे यांनी कर्मचार्यांना सुरक्षा नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आणि सुरक्षित कार्यसंस्कृतीच्या गरजेवर भर दिला.या आठवड्यात आगीपासून बचाव, आपत्कालीन परिस्थिती हाताळणे, प्रथमिक उपचार प्रशिक्षण आणि सुरक्षा शपथ विधी यांसारखे उपक्रम पार पडले. या आठवड्यात विविध उपक्रम घेण्यात आले जसे की, सुरक्षा संबंधित चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, कविता, आणि सुविचार स्पर्धा घेण्यात आल्या, विजेत्याना ,उत्कृष्ट सुरक्षा पालन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.सुरक्षा व्यवस्थापक रामचंद्र इंगोले यांनी यावेळी सांगितले, "सुरक्षा हा एक दिवस किंवा आठवडाभर साजरा करण्याचा विषय नाही, तर तो आपल्या रोजच्या कामाचा अविभाज्य भाग असायला हवा. सतर्कता आणि जबाबदारी हीच सुरक्षिततेची गुरुकिल्ली आहे." तसेच हे एक टीम वर्क आहे.या समारोप सोहळ्याच्या निमित्ताने पिट्टी इंजिनिअरिंग लिमिटेड] ने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित कार्यस्थळ निर्माण करण्याची वचनबद्धता दर्शवली.

राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाच्या समारोप सोहळ्यात आणि धन्यवाद प्रस्ताव देताना पट्टी इंजिनिअरिंग लिमिटेडचे सुरक्षा अधिकारी बळीराम मिंड यांनी सुरक्षिततेच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी सांगितले, "सुरक्षा ही केवळ नियमांची चौकट नसून ती आपली सवय आणि कार्यसंस्कृतीचा एक अविभाज्य भाग असला पाहिजे."

# कन्नड येथे स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया(SFI) च्या युनिटची स्थापना



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड येथे दिनांक ०८ मार्च रोजी शिवाजी महाविद्यालय कन्नड येथेस्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) च्या युनिट ची स्थापना करण्यात आली. यावेळी SFI छत्रपती संभाजीनगर समितीचे जिल्हा सहसचिव अरुण मते व विद्यापीठ समिती सदस्य कृष्णा कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत या युनिट बांधणीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध प्रागतिक कवियत्री डॉ.प्रतिभा अहिरे यांची उपस्थिती होती. उपस्थित विद्यार्थ्यांना संघटनेची घटना, उद्देश,कार्य, कार्यपध्दती व विचारधारा या संदर्भात अरुण मते यांनी मार्गदर्शन केले तसेच जिवनात मुल्यांचे महत्त्व डॉ. प्रतिभा अहिरे यांनी सांगितले. देशातील शिक्षण व्यवस्था व विद्यार्थ्यांन समोरील आव्हाने या विषयावर देखील त्यांनी प्रकाश टाकला. या बैकठीत पवन जाधव यांची एसएफआय कन्नड़ तालुका युनिट अध्यक्ष म्हणून तर सचिव म्हणून ऋषिकेश सुरेवाड यांची एकमताने निवड करण्यात आली. युनिट सचिव मंडळ सदस्यपदी रुपाली बोंबले, प्रेम दापके, उमेश राठोड,कल्याणी सोनवणे यांची एकमताने निवड करण्यात आली.

तसेच युनिट सदस्य म्हणून जिया पटेल, ऋषिकेश निकम, ओमकार शेळके,कार्तिक परदेशी यांची एकमताने निवड करण्यात आली. या प्रसंगी ,पवन मोरे, सतीश राठोड व कन्नड़ शहरातील इतर विद्यार्थी उपस्थित होते.






# संघर्ष कृती समीतीचा पाठपूरावा, चाळीसगाव संभाजीनगर रेल्वे सर्वेक्षणाला मंजुरी



**कन्नड (अरुण थोरात):** गेल्या दहा वर्षा पासून चाळीसगाव - कन्नड- संभाजीनगर रेल्वेचे मार्गाचा प्रथम सर्वे करण्यात आला होता २०१५-१६ मध्ये. परंतु केंद्र शासन च्या उदासीन धोरणामुळे व बजेट मुळे सदरील मार्ग सर्वे होऊन सुद्धा होऊ शकला नाही व शासनाने त्याला स्थगिती दिली. कन्नड तालुक्यातील सर्वांचाच आग्रह असल्यामुळे व वारंवार पाठ पुरवठा केल्यामुळे याला आता अंतिम सर्वे मंजूर करण्यात आला या सर्व साठी दोन लक्ष ३२ लाख ५० हजार रुपये मंजुरी सुद्धा शासनाच्या वतीने देण्यात आले. चाळीसगाव ते संभाजीनगर सदर हे ९३ किलोमीटर असून लवकरच या रेल्वे मार्गाचा सर्वे करून शासन दरबारी अहवाल तयार करून देण्यात येणार आहे. अभिषेक जागवत डायरेक्टर घाटी शक्ती सिविल रेल्वे बोर्ड यांच्या सही सहित याला मंजुरी देण्यात आली आहे. चाळीसगाव संभाजीनगर रेल्वेला तात्काळ मंजुरी द्या यासाठी दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर इथे संघर्ष कृती समितीच्या वतीने सहा दिवस धरणे आंदोलने करण्यात आले होते.

यामध्ये कन्नड तालुक्यातील लोकांनी स्वयं स्फूर्ती सहभाग नोंदवला होता कन्नडच्या विकासाला चालना मिळण्या साठी रेल्वे मार्ग व चाळीसगाव घाटातील बोगदा होणे अत्यंत जरुरीचे होते. तात्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांची भेट घेऊन त्यांनाही निवेदन देण्यात आले होते. सदरील अंतिम सर्वे करणे व तात्काळ अहवाल सादर करणे हे पत्र दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी निघाले. कन्नड तालुक्यातून मुख्य रस्त्यालगत असलेल्या गावातून ग्रामपंचायतीने बोगदा साठी ठराव पण दिले होते. कन्नड तालुक्यातील एक लाख लोकांच्या सह्या निवेदन घेऊन संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब शिंदे, अशोक दाबके डॉ सदाशिव पाटील यांनी तत्कालीन तात्कालीन मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे पालकमंत्री सुभाष देसाई मुंबई येथे जाऊन निवेदन दिले. दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विन कुमार व रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे व रेल्वे बोर्डाचे चेअरमन अशोक कुमार जी जयस्वाल यांची प्रत्यक्ष भेट घेऊन एक लाख लोकांच्या सहीचे निवेदन दिले. सदरील रेल्वे मंजुरीसाठी तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे संभाजीनगर जिल्ह्याचे मा. खासदार चंद्रकांत खैरे, विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

मा. उच्च न्यायालयाने जड वाहन चाळीसगाव घाटातून बंद केल्यामुळे कन्नड शहरातील व तालुक्यातील व्यवसाय डबघाईत आलेले आहे.या रेल्वे मार्गामुळे कन्नड तालुक्याला नव्याने विकासाला गती मिळणार असून खासदार संदिपान भुमरे यांच्या नेतृत्वाखाली व आमदार संजना जाधव यांच्या उपस्थितीत दिल्ली येथे जाऊन नितीन जी गडकरी साहेब यांची लवकरच भेट घेऊन घाटातील बोगद्या संदर्भात योग्य निर्णय लवकरच घेणार आहे. या रेल्वे मार्गा मुळे कन्नड तालुक्यातील जनतेमध्ये व व्यापाऱ्यां मध्ये एक आनंदमय वातावरण निर्माण झालेला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ मार्च २०२५


## महाराष्ट्राचा तालीबान करण्याचा भाजपचा कुटील डाव - हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई :** महाराष्ट्राला महान साधू संत व महापुरुषांचा जाज्वल्य इतिहास आहे. पण एका विशिष्ट विचारसरणीचे लोक जाणीवपूर्वक खोटी माहिती पसरवून, इतिहासाचे विद्रूपीकरण करून वातावरण दुषित करत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांनी अठरापगड जातीच्या मावळ्यांना सोबत घेऊन स्वराज्य स्थापन केले. महाराजांनी कधीही कोणाचा द्वेष केला नाही. पण छत्रपती शिवाजी महाराजांचेच नाव घेऊन महाराष्ट्राच्या सामाजिक सौहार्दतेला सुरुंग लावण्याचा प्रयत्न भाजपकडून सुरु आहे. याचाच भाग म्हणून नीतेश राणेंना पुढे करून प्रक्षोभक वक्तव्ये केली जात आहेत. महाराष्ट्राचा तालिबान करण्याचा भाजपचा कुटील डाव असून तो जनतेने ओळखावा, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

राज्याचे मत्स्यपालन व बंदर विकास मंत्री नीतेश राणे यांनी केलेल्या विधानाचा हर्षवर्धन सपकाळ यांनी समाचार घेतला. हा मंत्री मटन कोणाकडून घ्यायचे व कोणाकडून घ्यायचे नाही हे जाहीरपणे सांगत आहे. कोणी काय खावे व कोणाकडून काय विकत घ्यावे, हे सांगण्याचा अधिकार ह्या मंत्र्याला कोणी दिला? असा सवाल सपकाळ यांनी केला. हलाल, झटका, किंवा आणखी काय हे जनतेला ठरवण्याचा अधिकार आहे, हे मंत्र्यांचे काम नाही, असेही ते म्हणाले.

नीतेश राणे यांचा कोणताही अभ्यास नाही, कोणताही विचार नाही, केवळ माझा बॉस सागर बंगल्यावर आहे व माझे कोणी काही करू शकत नाही अशी जाहीर विधाने करून समाजात विष कालवण्याचे काम करत आहे. याआधीही नीतेश राणेंच्या गुंडांनी कणकवली मध्ये शेख अशरफ या तरुणाला "जय श्रीराम बोल" म्हणत मारहाण केली, यप्रकरणी कारवाई करण्याचे कोर्टाने आदेश देऊनही कारवाई केली जात नाही. नीतेश राणे उघडपणे धार्मिक तेढ निर्माण करणारी वक्तव्ये करून दंगली भडकावण्याचा प्रयत्न करत असतात. पण अद्याप त्यांच्यावर कारवाई झाली नाही, राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री व पोलिस विभाग काय झोपा काढत आहे का? असा संतप्त सवाल सपकाळ यांनी विचारला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यात एकही मुस्लीम नव्हता असे विधान करून या नीतेश राणेंनी आपल्या अकलेचे तारे तोडले आहेत. या महाशयाचे विधाने पाहता त्यांना कशाचाही अभ्यास नाही, इतिहासाचा तर अजिबात गंध नाही, असे स्पष्ट दिसत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यात सरनोबत नूरखान बेग तर तोफखाना प्रमुख इब्राहीम खान होता, महाराजांचा अंगरक्षक इब्राहिम सिद्दी तर वकील काझी हैदर होता. अफजल खान भेटीच्यावेळी १० अंगरक्षकांमध्ये हा इब्राहिम सिद्दी होता. तर महाराज आग्र्याच्या कैदेत असताना हिरोजी फर्जत बरोबर मदारी मेहतर ह्या मुस्लीम सेवकाने महत्वाची जबाबदारी पार पाडली होती, यांच्यासह असंख्य मुस्लीम सैनिक महाराजांच्या सैन्यदलात होते. पण ज्यांनी डोळ्यावर पट्टी बांधली आणि गरळच ओकायची ठरवले असेल तर त्यांच्यावर जालीम इलाज केला पाहिजे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

बंदर विकास मंत्री नीतेश राणे दररोज संविधान आणि कायद्याला पायदळी तुडवून सातत्याने प्रक्षोभक, भडकाऊ व हिंदू मुस्लीम अशी गरळ ओकत आहेत, त्याला मुख्यमंत्री यांचा पाठिंबा आहे का? आणि नसेल तर राणेंची मंत्रिमंडळातून तात्काळ हकालपट्टी करा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

## महिलांना आत्मनिर्भरतेचे महत्त्व पटवून देणे आवश्यक डॉ. अनिता मुदकन्ना रोटरीच्या वतीने विविध क्षेत्रातील महिलांचा गौरव



**मुरूम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महिलांनी स्वतःच्या व इतर महिलांच्या यशाचा गौरव केला पाहिजे. अनेकदा समाजात महिलांना कमी लेखले जाते, त्यामुळेच महिलांनी एकमेकींचे समर्थन करणे आवश्यक आहे. आर्थिक, मानसिक, सामाजिक स्वावलंबन महत्त्वाचे आहे. महिलांनी स्वतःच्या स्वातंत्र्याविषयी आणि आत्मनिर्भरतेविषयी बोलले पाहिजे. लैंगिक भेदभाव, सुरक्षितता, समान संधी यासारख्या विषयांवर चर्चा करून उपाय शोधणे गरजेचे आहे. स्वतःला कमी लेखू नका, स्वतःचा आदर करा, तुमच्या क्षमतांवर विश्वास ठेवा. तरुण मुलींना योग्य दिशा दाखवणे, त्यांना शिक्षण, करिअर व आत्मनिर्भरतेचे महत्त्व पटवून देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. अनिता मुदकन्ना यांनी केले.रोटरी क्लब मुरूम सिटी च्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून प्रजापिता ब्रह्मकुमारी केंद्रात आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरीचे अध्यक्ष कमलाकर मोटे होते. यावेळी प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, राजयोगी वैजीनाथ (येरमाळा), ब्रह्मकुमारी अनुसया, केंद्राचे संचालक राजूभाई भालकाटे, रोटरीचे सचिव सुनिल राठोड आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उद्योजिका मीराबाई शिंदे, श्रुती चौधरी, सावित्रीबाई कोकणे, पोलीस हवालदार मनीषा लोखंडे, पूजा मुळे, रामेश्वरी पवार, आफरीन मुजावर, डॉ. प्रिती चिलोबा, डॉ. चैतन्या काबरा, डॉ. शिल्पा डागा, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. वर्षा बिराजदार, ग्रामीण रुग्णालयातील परिचारिका पूजा जाधव, शितल सुरवसे, राजश्री जाधव, सुजाता स्वामी, लालूबाई राठोड, ममता साबणे, ब्रह्मकुमारी अनुसया, वैष्णवी, सुंदर भालकाटे आदींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यासंगी शिवकन्या भालकाटे यांनी शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर मनोगत व्यक्त केले. मनोगत डॉ. चैतन्या काबरा, प्रिती चिलोबा, मनीषा लोखंडे यांनी मनोगत तर श्रुती चौधरी यांनी कविता सादर केली.

यावेळी आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. महेश मोटे, उपप्राचार्य कलया स्वामी, प्रा. भूषण पाताळे, प्रकाश रोडगे, मल्लिकार्जुन बदोले, शिवशंकर स्वामी, डॉ. महेश स्वामी, राजकुमार वाकडे, कलाप्पा पाटील या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नितीन डागा यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कांबळे तर आभार सुनिल राठोड यांनी मानले. यावेळी परिसरातील बहुसंख्येने माता-भगिनी उपस्थित होत्या. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील प्रजापिता ब्रह्मकुमारी केंद्रात जिजाऊंच्या प्रतिमेस पुष्पहार घालून उद्घाटन करताना अनिता मुदकन्ना, कमलाकर मोटे व अन्य.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ मार्च २०२५

# गझल हे माणसे जोडण्याचे माध्यम - गिरीश जोशी




**छत्रपती संभाजीनगर :** जीवन विकास ग्रंथालयाच्या 52 व्या वर्धापनदिनानिमित्त दोन दिवस विशेष कार्यक्रम घेण्यात आले. शनिवार दिनांक 8 मार्च 2025 रोजी सायंकाळी सौ. अनुराधा पिंगळीकर यांच्या 'मी जनी नामयाची' - एक भावनोत्कट एकपात्री प्रयोग हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात होता. त्याला श्रोत्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.रविवार दिनांक 9 मार्च 2025 रोजी सायंकाळी गझलयात्रा हा मराठी, हिंदी, ऊर्दू गझलांचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गझल सादरीकरण मैफलमध्ये रमेश ठोंबरे, गिरीश जोशी, शेलैश देशपांडे (छ.संभाजी नगर), राज रणधीर (जालना), राना दौड (जाफ्राबाद), सोमिनाथ सोनवणे (सिल्लोड) इत्यादी गझलकारांच्या दमदार सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. डॉ राज रणधीर ह्यांनी,दु:ख क्षणाचे असते वेड्या आयुष्याचे नाहीलढणाऱ्याचे जीवन असते रडणाऱ्याचे नाहीही गझल सादर केली.सोमिनाथ सोनवणे ह्यांनी,का कशाने कोंडमारा वाढतो आहेआत दु:खाचा पसारा वाढतो आहेही गझल सादर केली. तर राना दौड ह्यांनीअसू दे जरा लक्ष माझ्या घरावरतसा कोण आहे कुणाच्या बऱ्यावरही गझल सादर केली. गिरीश जोशी ह्यांनी,मी केलेल्या कार्याचा डंकाच पिटवला नाही,मी साधे जीवन जगलो,इतिहास घडवला नाही,ना सूर्य कुणाचा झालो ,ना पणती होऊ शकलो,पण,कुठल्याही घरट्याच्या,मी दिवा विझवला नाही.ही गझल सादर केली.रमेश ठोंबरे ह्यांनी,मी माझ्याशी सांगत असतो काही बाहीमी दुनियेला सांगत असतो काही बाहीही गझल सादर केली.तर शैलेश देशपांडे ह्यांनीदे उन्हाचा दाह मजला घोर नाही, पण;बाप माझा राबतांना सावलीही देपांडुरंगा एवढेसे दान दे आता,भूक तू देतोस तेव्हा भाकरीही दे.ही गझल सादर केली. त्यानंतर झालेल्या गझल गायन मैफलीत युवा गझल गायक रिषी त्रिवेदी ह्यांनी 'कभी कभी यू ही हमने अपने जी को बेहलाया है-निदा फाजली," राज ए उल्फत छुपा के देख लिया -फैज अहमद फैज , ' 'दिल के करीब आके वो जब दूर हो गये - अतुल अजनबी, ' 'सर रे राह कुछ भी कहा नहीं- बशीर बद्र ,' 'दुख छुपाए हुवे है हम दोनो - अहमद फराझ' , ' चमन से कौन चला ये खामोशिया लेकर ' , 'बस यही सोच के तुमसे नजर मिलाली है ', 'शेवटी शेवटी खूप आल्या सरी -वैभव जोशी ', 'वो मेरा था ये बताना अजीब लगता है- इसरार अन्सारी ' , ' कब खयाल आपका नही होता- मिर्झा गालिब ' इत्यादी जुन्या-नव्या हिंदी, ऊर्दू,मराठी गझल गाऊन रसिकांची मने जिंकली. उत्तम गझलांची निवड,त्यास साजेशा चाली,अभ्यासपूर्ण गायनातून शेर उलगडून दाखवण्याचे कसब आणि दिलखेचक सुरावट ही रिषी त्रिवेदी ह्यांच्या गझल गायकीची वैशिष्ट्ये श्रोत्यांना खिळवून ठेवणारी होती. गझल गायनाची आणि सादरीकरणाची ही हृद्य मैफल सुरुवातीपासून शेवटपर्यंत अत्यंत उंचीवर पोहोचली. तबल्यावर कृष्णा सवासे, व्हायोलिनवर प्रबोध जोशी या युवा कलाकारांनी सुंदर साथसंगत केली. गझलकार गिरीश जोशी यांनी बहारदार सूत्र संचालन करत मैफलीत रंग भरले. विशेष म्हणजे कार्यकारिणी सदस्य प्राचार्य जीवन देसाई यांनी उत्कृष्ट गजल सादर करून रसिकांना आश्चर्यचकीत केले. श्रीकांत उमरीकर यांनी आभार मानले. अविनाश ठिगळे ह्यांनी ध्वनी व्यवस्था उत्तमरीतीने सांभाळली. मैफलीच्या यशस्वी आयोजनासाठी न्या.अंबादासराव जोशी, डॉ.राजशेखर बालेकर, नितीन कंधारकर, नृसिंह कुलकर्णी,भा.बा.आर्वीकर, जीवन देसाई, नितीन काजवे, प्र.रा.बडवे, अशोक लाटे, सौ.संगिता मंडलिक, सौ. भाग्यश्री आर्वीकर, श्रीकांत उमरीकर, महेश बावस्कर, डॉ. विनोद सिनकर, गिरीश जोशी इत्यादींनी श्रम घेतले. यावेळी रसिकांमध्ये प्रा.विजय पोहनेरकर, प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी ,श्रीधर नांदेडकर, रवी कोरडे, सुनील उबाळे, सुहास महाजन, मृणाल देशपांडे, कस्तुरी कुलकर्णी, संजीवनी कुलकर्णी, सुनीता कपाळे, विजय पांचाळ, संदेश वाघमारे, महेश कुलकर्णी, सुशील सातपुते, योगेश अक्कर, गणेश कुलकर्णी, सारंग टाकळकर, जयदीप रनसिंग यांच्यासह शहरातील गझल रसिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून ह्या गझल मैफलीचा आस्वाद घेतला.

# महाराष्ट्रात सापडला तेलाचा मोठा खजिना





**मुंबई :** अरबी समुद्रातील सिंधुदुर्ग आणि पालघर जिल्ह्यांतील सागरी क्षेत्रात खनिज तेलाच्या नव्या साठ्यांचा शोध लागला आहे. खनिज तेलाच्या या नवीन साठ्यांमुळे भारत तेलाचे उत्पादन करण्यास सक्षम असेल अशी आशा निर्माण झाली आहे. सिंधुदुर्गजवळील मालवण समुद्रात तर पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील सागरी क्षेत्रात सुमारे १८ हजार चौरस किलोमीटरपेक्षा जास्त क्षेत्र व्यापलेल्या नवीन तेलाचे साठे सापडले आहेत. केंद्रीय तेल उत्पादन कंपन्या लवकरच त्या भागात संशोधनाद्वारे उत्खनन करणार आहेत. हे संशोधन अरबी समुद्रात ८ वर्षांपासून सुरू आहे.

महाराष्ट्राच्या तळ कोकणाजवळील अरबी समुद्रात हे नवे तेलसाठे सापडले आहेत. अरबी समुद्रात तेल साठ्यांसाठी ८ वर्षांपासून हे संशोधन सुरू होते. केंद्रीय पेट्रोलियम खात्याने या नव्या तेलसाठ्याच्या संशोधन कार्याला गती दिली आहे. पालघरमधील डहाणूजवळ ५ हजार ३३८ आणि सिंधुदुर्गजवळील मालवणजवळ १३ हजार १३१ चौरस किमी क्षेत्रफळावर हे तेलसाठे आहेत. डहाणू आणि मालवण येथे तेल विहिरींचे उत्खनन सुरू होईल.

दरम्यान, महाराष्ट्रात यापूर्वी १९७४ मध्ये मुंबईच्या समुद्रात ७५ सागरी मैल अंतरावर खनिज तेलाचा मोठा साठा सापडला होता. बॉम्बेहाय नावाने ही तेल खाण ओळखली जाते. या ठिकाणावरून अद्यापही मोठ्या प्रमाणावर खनिज तेल उत्खनन होत आहे. यानंतर २०१७ मध्ये तेल साठे सापडले होते. याठिकाणी अमृत' आणि 'मुंगा' या दोन तेल विहिरी खोदण्यात आल्या. आधीच्या दोन तेल साठ्यांच्या तुलनेत सध्या सापडलेला तेल साठा मोठा असल्यामुळे तेल उत्पादन चार पटीने वाढणार आहे. यामुळे महाराष्ट्रातील विकास प्रक्रियेला नवी दिशा मिळणार आहे. अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे की, हे नवे तेल साठे भारताला तेल उत्पादनात आत्मनिर्भर बनवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतील. या नव्या तेल विहिरींच्या उत्खननामुळे कोकणातील उद्योग क्षेत्राला नवी झळाळी मिळणार असून यामुळे स्थानिक उद्योगांना चालना मिळण्यासह रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील.